“e-PICS अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेच्या नक्कल फी बाबत ”

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राभूअ-२०१९/प्र.क्र.२८९/ल-१**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक : ०२ जुलै, २०२०

**वाचा:-**

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००१/प्र.क्र.१२१/ल-१, दि.२५.०९.२००१
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक राभूअ-२०१६/प्र.क्र.३५०/ल-१, दि.३१.०३.२०१७
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक राभूअ -२०१८/प्र.क्र.३४/ल-१, दि. ३१.०१.२०१९
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक राभूअ -२०१८/प्र.क्र.३९७/ल-१, दि. ३१.०१.२०१९
५) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक राभूअ -२०१८/प्र.क्र.२०९/ल-१, दि.२६.०३.२०१९
६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -२०१९/प्र.क्र.८३/ल-१, दि.१९.०९.२०१९
७) जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.ना.भू./e-PICS/संगणकीकृत मि.प. नककल फी/२०१९, दि.१८.०४.२०१९ चे पत्र

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ व १२६ अंतर्गत नागरी क्षेत्राचे भूमापन करुन शहर (नागरी)/गावठांण यामधील मिळकतींचे स्वतंत्र नकाशा व अधिकार अभिलेख तयार केले जातात. ते अधिकार अभिलेख जनतेला मिळकत पत्रिका (Property card) स्वरुपात भूमि अभिलेख विभागातंर्गत नगर भूमापन अधिकारी कार्यालय तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय यांचेमार्फत उपलब्ध होतात. नगर भूमापन अधिकारी कार्यालय तसेच उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात हस्तनोंद पध्दतीने मिळकत पत्रिकेवर फेरफाराची नोंद केली जाते व अभिलेख अद्यावत केले जातात.

केंद्र शासनाने ईझ ऑफ डुईंग बिजनेस' (Ease of Doing business) व जागतिक बँक (World Bank) यांनी सर्व अभिलेख संगणकीकृत करणे, फेरफार प्रक्रीयांत सुटसुटीतपणा, तत्परता आणि किमान मानवी हस्तक्षेप यांचा पुरस्कार केलेला आहे. “ईझ ऑफ डुईंग बिजनेस” व्यवस्थेवरच संबंधित राज्याच्या गुणवत्तेचा क्रमांक (Ranking) निश्चित केला जातो. ही बाब विचारात घेता महाराष्ट्र राज्याच्या नागरी भूमापनाच्या अधिकार अभिलेखांबाबत (मिळकत पत्रिकाबाबत) सुध्दा ऑनलाईन फेरफारांची e-PCIS प्रणाली लागू करणे आवश्यक आहे. मिळकत पत्रिका ही नागरी जनतेशी निगडीत असल्याने व संगणक साक्षरता नागरी भागात जास्त असल्यामुळे ह्या प्रणालीचा वापर न्यायसंगत ठरणार असून जनतेला तात्काळ सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यासाठी वाचा क्रमांक २ अन्वये e-PCIS राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. e-PCIS प्रकल्पाअंतर्गत संगणकीकृत मिळकत पत्रिका उपलब्ध होणार आहेत. वाचा क्रमांक १ अन्वये मिळकत पत्रिकेची नक्कल फी ची रक्कम ठरवून देणेत आलेली आहे. परंतू आता संगणकीकृत मिळकत पत्रिकेची नक्कल फी ठरविणे आवश्यक आहे.

महाभूलेख संकेतस्थळावरून डिजीटल स्वाक्षरीने e-PCIS अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेच्या नक्कलसाठी नक्कल फी आकारण्यात येणार आहे. सदर प्रकल्पांकरीता विकसित करण्यात आलेल्या अज्ञावलींची भविष्यातील देखभाल व तांत्रिक सहाय्य (Maintaince and support)ही अतिशय महत्वाची व आवश्यक बाब असून, त्यासाठी महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्थेस सक्षम बनविणे अत्यंत गरजेचे आहे. संगणकीकृत मिळकत पत्रिकेची नक्कल फी ठरविणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर निधी उभारण्यासाठी e-PCIS अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेच्या नक्कल या महसूली विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्कातून प्राप्त होणाऱ्या शुल्काचा शासनाच्या हिस्सा वाचा क्रमांक ६ अन्वये उघडण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली व महाभूमि प्रकल्प व्यवस्थापन संस्थेस सक्षम बनविण्यासाठीचा हिस्सा जमाबंदी आयुक्त आणि संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्वीय प्रपंजी लेखा खात्यात जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

महाभूलेख संकेतस्थळावरून डिजीटल स्वाक्षरीने e-PCIS अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकेच्या नक्कल वितरीत करताना आकारण्यात येणाऱ्या शुल्काची विभागणी पुढीलप्रमाणे आकारण्यात यावी व त्यामधून प्राप्त झालेल्या फी चा हिस्सा विविध घटकांप्रमाणे वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**(अ)** महाभूलेख संकेतस्थळावरून डिजीटल स्वाक्षरीने e-PCIS अंतर्गत देण्यात डिजीटल स्वाक्षरीने वितरीत करण्यात येणाऱ्या मिळकत पत्रिकेच्या प्रस्तावित शुल्काची आकारणी आणि शासन व भूमि अभिलेख विभागाचा हिश्श्याचे रक्कमांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | वितरणाचे ठिकाण | क्षेत्रनिहाय प्रती पुरवठा करण्याची फी (आकडे रुपये) व त्यामधील विविध घटकांचा हिस्सा | | |
|---|---|---|---|---|
| | | महानगर-पालिका क्षेत्राकरिता | अ, ब, क वर्ग नगर पालिका, नगरपंचायत | ग्रामीण क्षेत्रासाठी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | महाभूमी संकेत-स्थळावरुन प्राप्त डिजीटल मिळकत पत्रिका. | रु. १३५/- | रु.९०/- | रु.४५/- |
| २ | विविध घटकांचा हिस्सा | i) महाराष्ट्र शासन-२/३ हिस्सा<br>ii) ज.आ.आणि सं.भू.अ., स्विय प्रपंजी लेखा १/३ हिस्सा | i) महाराष्ट्र शासन-२/३ हिस्सा<br>ii) ज.आ.आणि सं.भू.अ., स्विय प्रपंजी लेखा १/३ हिस्सा | i) महाराष्ट्र शासन-२/३ हिस्सा<br>ii) ज.आ.आणि सं.भू.अ., स्विय प्रपंजी लेखा १/३ हिस्सा |

**(आ)** महाभूलेख संकेतस्थळावरून डिजीटल स्वाक्षरीने जुन्या अभिलेखांच्या नक्कला आणि डिजीटाईज्ड नकाशांच्या नक्कला प्रस्तावित शुल्काची आकारणी आणि शासन व भूमि अभिलेख विभागाचा हिश्श्याचे रक्कमांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | सेवेचा प्रकार | प्रती पुरवठा करण्याची फी(आकडे रुपये) | विविध घटकांचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ | स्कॅनिंग अभिलेख | रू.३०/-प्रती फाईल (JPG/PDF) (प्रति अभिलेख रू.६०/- या मर्यादेत अधीन राहून) | i) महाराष्ट्र शासन-२/३ हिस्सा ii)ज.आ.आणि सं.भू.अ., स्विय प्रपंजी लेखा १/३ हिस्सा |
| आ | डिजीटाईज्ड नकाशांच्या प्रती | रू.३०/- प्रती फाईल (JPG/PDF) | |

२. उक्त प्रमाणे नक्कलाच्या वितरणातून प्राप्त होणाऱ्या निधीची रक्कम स्विकारण्यासाठी व निधीचे व्यवस्थापन करण्यासाठी महाभूमी प्रकल्प व्यवस्थापन संस्थेने नक्कल फी व्यवस्थापन प्रणाली ( Online Accounting System ) विकसित करावी .

३. स्वीय प्रपंजी लेख्यात जमा होणारी रक्कम व डिजीटाईज्ड अभिलेख देण्यासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च याचा आढावा दर वर्षी एप्रिल महिन्यात घेऊन पुढील वर्षातील ६ महिन्याकरीता अपेक्षीत रक्कम ठेवून प्रत्येक वर्षी उर्वरित रक्कम शासनाच्या एकत्रित निधीत जमा करणे आवश्यक राहील व त्याचा अहवाल वित्त विभागास सादर करण्यात यावा

४. स्वीय प्रपंजी लेख्यातील रक्कम ही राज्य शासनाच्या खरेदी व सेवा बाबतच्या विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात यावी. तसेच या खर्चावर विभागाचे संनियंत्रण राहील.

५. अभिलेखांच्या नकला वितरणातून प्राप्त होणाऱ्या रकमेपैकी महाभूमी प्रकल्प व्यवस्थापन संस्थेचा हिस्सा नक्कल फी व्यवस्थापन प्रणाली ( Online Accounting System ) मधून प्राप्त अहवाला प्रमाणे प्रत्येक मागील सप्ताहात जमा झालेली सदर रक्कम ही पुढील सप्ताहाच्या पहिल्या कामाच्या दिवशी संदर्भाधीन क्र.५ अन्वये स्वीय प्रपंजी लेखा खाते उघडण्यास दिलेल्या मान्यतेच्या स्वीय प्रपंजी लेखा खाते मध्ये जमा करण्यात यावी.

६. तसेच प्रत्येक महिन्याच्या अखेरीला अशा प्राप्त नक्कल फी पैकी शासनाचा हिस्सा व्यवस्थापन प्रणाली (Online Accounting System) मधून प्राप्त अहवाला प्रमाणे GRAS प्रणालीद्वारे शासनाने वाचा क्रमांक ६ अन्वये विहित केलेल्या लेखा शीर्षाखाली जमा करणे आवश्यक राहील .

७. सदर निधीचा वापर या आज्ञावलीच्या देखभाल व तांत्रिक सहाय्य तसेच याच अनुषंगाने भविष्यात विकसित करण्यात येणाऱ्या आज्ञावली साठीच करण्यात यावा. तसेच त्यातून खर्च करावयाचा झाल्यास त्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी समितीची आगाऊ मान्यता घेण्यात यावी.

८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर स्वीय प्रपंजी लेख्यातील जमा व खर्चाचा ताळमेळ महालेखापालाकडे वेळोवळी देण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर निधीबाबत आर्थिक व भौतिक अहवाल उपयोगिता प्रमाणापत्रासह शासनास पाठवावे.

९. सदर शासन निर्णयातील सूचना सर्व विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व महसूल अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१०. जनतेच्या माहितीसाठी सदर शासन निर्णयास जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतची जबाबदारी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व अधीक्षक, भूमि अभिलेख यांची, तालुकास्तरावर तहसिलदार व उप अधीक्षक, भूमि अभिलेख यांची तर शहर भागामध्ये नगर भुमापन अधिकारी यांची राहील.

११. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६८९/व्यय-१०, दि.१३.११.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००७०२११४१२५३३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(डॉ.संतोष भोगले)**
सह सचिव

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव.
६. अपर मुख्य सचिव (वित्त) / प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान)
७. सर्व विभागीय आयुक्त
८. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे
९. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. सर्व जिल्हाधिकारी
११. महालेखापाल, लेखा परीक्षा, महाराष्ट्र १ व २, मुंबई / नागपूर
१२. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १ व २, मुंबई / नागपूर
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१४. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६. निवड नस्ती